**प्रेसनोट** **दि.३०/०३/२०१९**

## कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे.

## तामीळनाडू येथील आरोपीस मुंबई येथून अटक

सय्यद आफाक खुर्रम, रा.मार्वेल इलान, फ्लॅट नं.१, बोट क्लब रोड, पुणे. मूळ गाव वानीएमबाडी, टाऊन स्टेशन, जिल्हा वेल्लूर, राज्य तामिळनाडू हे डी.सी. डिझाईन कंपनी, चिंचवड, पुणे येथे चीफ फायनान्शियल पदावर नोकरी करतात. सदर कंपनी ही अवंती कारचे प्रॉडक्शन करते. यातील फिर्यादी व आरोपी हे एकमेकांचे मित्र व परिचयातील आहेत.

दि.१५/०५/२०१७ ते आजपर्यंत मार्वेल इलान, फ्लॅट नं.१, बोट क्लब रोड, पुणे व मूळ गाव वानीएमबाडी, टाऊन स्टेशन, जिल्हा वेल्लूर, राज्य तामिळनाडू या ठिकाणी इसम नामे (१)सबील अराफात कडईकार, वय २८ वर्षे, रा.३३/१, अब्दुल मुनाफ साहेब स्ट्रीट, एपानगर, न्यू टाऊन, वानीएमबाडी, जिल्हा वेल्लूर, तामिळनाडू (२) शकील अहमद कडईकर, वय ५२, रा. सदर (३) सी.एल.शफीक, वय २८ वर्षे, रा.रेल्वे स्टेशन रोड, खादर पेठ, वानीएमबाडी, वेल्लूर, तामिळनाडू यांनी आपापसांत संगनमत करून फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून, फिर्यादी यांचे डी. सी. कंपनीतून अवंती कार खरेदी केली, तिचे पैसे फिर्यादी यांनी दिले, ते त्यांनी फिर्यादी यांना परत केले नाही, फिर्यादी यांना धमकी देवून त्यांचे ई मेलचा पासवर्ड व क्रेडिट कार्डचा ओ.टी.पी. नंबर घेवून, फिर्यादी यांचे क्रेडिट कार्ड फिर्यादी यांचेकडे असताना आरोपींनी बनावट कागदपत्रे तयार करून, फिर्यादीं यांचे क्रेडिट कार्डचा परस्पर वापर करून ४२ लाख रू. काढले. तसेच स्टर्लिंग हॉलिडेजची मेंबरशीप घेताना फिर्यादींची कागदपत्रे जोडून, फिर्यादींची बनावट सही केली. असे सर्व मिळून वर नमूद आरोपी मजकूर यांनी ७६ लाख ५५ हजार रू. ची फिर्यादी यांची फसवणूक केल्याने, फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून वरीलप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

दाखल गुन्हयातील आरोपी बाबत माहिती घेतली असता त्यांचे मोबाईल नंबर स्विच ऑफ होते. ते राहते घर सोडून बँगलोर याठिकाणी वास्तव्यास गेले असल्याचे समजले., परंतु त्यांचा बंगलोर येथील पत्ता समजून येत नव्हता. त्यांचे बाबत गोपनीय माहिती काढली असता आरोपी शकील अहमद कडईकर हा नवीन मुंबई सेक्टर १९, उलवा मस्जिद जवळ, ताज बिल्डिंग येथे आला असलेबाबतची गोपनीय माहिती मिळाल्याने, सदर बाबत वरीष्ठांचे परवानगीने श्री भागवत शेंडगे, पोलीस उप-निरीक्षक, कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन पुणे, कर्मचारी विनोद साळुंके, श्रीनाथ कांबळे यांनी सदर ठिकाणी जावून सापळा रचून छापा घालून नमूद आरोपीस पकडून कायदेशीर बाबींची पूर्तता करुन त्याला शिवाजीनगर, पुणे न्यायालयात हजर करुन त्याची पोलीस कस्टडीची रिमांड घेण्यात आली.

सदरची कारवाई ही मा.श्री.बच्चन सिंह सो., पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ,२ पुणे शहर, मा.डॉ.प्रिती टिपरे सो., सहाय्यक पोलीस आयुक्त, लष्कर विभाग, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली श्री.मदन बहाद्दरपुरे सो, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे, श्री. भागवत शेंडगे, पोलीस उप-निरीक्षक, कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन पुणे, पोलीस कर्मचारी विनोद साळुंके, श्रीनाथ कांबळे यांनी कामगिरी केलेली आहे.

(मदन बहाद्दरपुरे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
कोरेगांव पार्क पो.स्टे.पुणे शहर.